# सहसंचालक,, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर

दुरध्वनी क्र. 0712-6465145/46 कार्यासन दु. क्र. 0712-6465145

E-mail : ronagpur@dtemaharashtra.gov.in Website: rdtenagpur.org.in

क्र.तशिस/विकाना/वृक्ष लागवड/2018/ 1529

दिनांक:- 16 APR 2018

प्रति,

प्राचार्य,
शासकीय तंत्रनिकेतन, नागपूर, गोंदिया, साकोली, ब्रम्हपुरी, गडचिरोली,आर्वी.
शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, नागपूर, चंद्रपूर
शासकीय हॉटेल मॅनेजमेंट अँन्ड कॅटरींग टेक्नॉलॉजी, नागपूर.
प्राचार्य, सर्व शासकीय अनुदानीत पदविका संस्था.
प्राचार्य/संचालक, सर्व विनाअनुदान पदवी, पदवीका, व पदव्युत्तर पदवी संस्था, नागपूर विभाग, नागपूर

**विषय**:- 2018 व 19 करीता वृक्ष लागवड करण्यांबाबत नियोजन व माहिती सादर करण्यांबाबत..

**संदर्भ** :- या कार्यालयाचे पत्र क्र तंशिसं/विकाना/व्रक्षलागवड/2018/555, दिनांक 05.02.2018

संदर्भीय पत्रान्वये सन 2018 करीता वृक्ष लागवड व संगोपन कशा पध्दतीने करावे याबाबत कळविण्यांत आलेले होते. परंतु ब-याच संस्थांनी सदर्भीय पत्रान्वये कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. तरी सदभीय पत्राचे पुन:श्च अवलोकन करुन त्यानुसार संस्था स्तरावर कार्यवाही करण्यांत यावी. (संदर्भीय पत्राची प्रत संलग्न)

महाराष्ट्‍ शासनाने सन 2018 मध्ये 13 कोटी व 2019 मध्ये 33 कोटी वृक्ष लागवडीचे उद्दिदष्ट आहे. त्याअनुषंगाने दिनांक 12.04.2018 रोजी मा सचिव, (वने) यांच्या अध्यक्षतेखाली व आयुक्त, नागपूर विभाग नागपूर यांनी, बैठक आयोजित केलेले होती. खालील प्रमाणे सुचना देण्यांत आलेल्या आहेत.

1. वृक्ष लागवडीबाबत नियोजन करण्यांबाबत कळविलेले आहे. (संदर्भीय पत्रानुसार)
2. लोकपयोगी वृक्ष लागवड करण्यांबाबत सुचना दिलेल्या आहेत. उदा. मोह, पळस, निम, बेहरा,बांबु,आंबा,साग, जांभुळ, आवळा,हिरडा,शिकेकाई,बोर इत्यादी प्रकारचे वृक्षाची लागवड केल्यास व योग्य संगोपन केल्यास आपल्या संस्थेच्या अंतर्गत उत्पनामध्ये (आय. आर.जी) सुध्दा वाढ होवू शकते.
3. सदर वृक्ष लागवड ही शासन मर्यादीत न राहता त्याबाबतीत लोकचळवळ निर्माण करावी, अशा हेतून त्याचा प्रचार आणि प्रसार करण्यांत यावा.
4. वृक्ष लागवड ही एक संस्थेच्या विकासाचा भाग म्हणून त्याचा एक पोर्टफोलीओ तयार करण्यांत यावा व त्यासाठी एक विशिष्ट अधिकारी/कर्मचा-याची समन्वयक म्हणून नेमणूक करण्यांत यावी त्याचे नांव व दुरध्वनी क्रमांक सोबतच्या विवरणपत्रामध्ये सादर करण्यांत यावे.
5. सन 2018 मध्ये वृक्ष लागवडीकरीता कीती खडडयाचे खोदकाम झाले आहे. त्या बाबतची माहिती सोबतच्या विवरणपत्रामध्ये दिनांक 30.04.2018 पर्यंत न चुकता सादर करण्यांत यावी. (फोटोसहीत)

माहे मे 2018 मध्ये पुन:श्च आयुक्त, नागपूर विभाग नागपूर आढावा बैठक घेणार असल्याने संस्था निहाय माहिती सादर करावयाची आहे. तरी सदर माहिती सोबतच्या विवरणपत्रामध्ये दिनांक 30.04.2018 पर्यंत या कार्यालयास सादर करावी

(गुलाबराव ठाकरे)
सहसंचालक
तंत्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय,
नागपूर

प्रत:- मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म. रा. मुंबई यांना माहिती करीता मानार्थ सादर (का.क्र 16)

D:\Tree Plantation.docx

## २०१८ करीता वृक्ष लागवड नियोजन विवरणपत्र

| अ.क्र | संस्थेचे नांव | समन्वयकाचे नांव व दुरध्वनी क्र. | एकूण क्षेत्रफळ | वृक्ष लागवडीकरीता उपलब्ध असलेल्या जागेचे क्षेत्रफळ | २०१८ करीता वृक्ष लावगडीकरीता तयार केलेल्या खडयांची संख्या | वृक्ष लागवडी चा प्रकार |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | हेक्टर मध्ये | | | |

Joint Director
Technical Education
Regional Office, Nagpur.

# सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

शासकिय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर

दुरध्वनी क्रं.:- ०७१२-६४६५१४५/१४६, फॅक्स क्रं.:- ०७१२-२५६१६६३

Web Site :- www.rdtenagpur.org.in E-Mail :- ronagpur@dtemaharashtra.gov.in


परीपत्रक

क्रमांकः-तंशिस/विकाना/वृक्षलागवड/2018/535

दिनांक - 5 FEB 2018

प्रति,

प्राचार्य/संचालक,

सर्व शासकीय,अनुदानित व खाजगी विना अनुदानित

व कायम विनाअनुदानित पदवी/पदव्युत्तर पदवी व पदविका संस्था,

नागपूर जिल्हा.

विषयः- सन 2018 या वर्षामध्ये एकुण 13 कोटी वृक्ष लागवडीचे यंत्रणानिहाय उद्दीष्ट वाटपाबाबत.

संदर्भः- मा. उपवनसंरक्षक, नागपूर वनविभाग, नागपूर यांचे पत्र क्र. कक्ष-3/13 कोटी/ 2017-18/5332 दि.20/01/2018

उपरोक्त विषयांन्वये आपणांस कळविण्यांत येते की, नागपूर जिल्हाकरिता सन 2018 या वर्षामध्ये 13 कोटी वृक्ष लागवडीचे उद्दीष्ट प्राप्त झालेले आहे. वरील संदर्भान्वये उच्च व तंत्र शिक्षण विभांगातर्गत नागपूर जिल्हानिहाय उद्दिष्ठानुसार या जिल्हाअतर्गत येत असलेल्या संस्थांना 5000 वृक्ष लागवड करण्यांचे ठरविण्यात आलेले आहे. त्यानुसार सन 2018 या वर्षामध्ये वृक्षलागवड कार्यक्रमांत जास्तीत जास्त प्रमाणांत सहभागी होण्यासाठी या विभांगाच्या अधिपत्याखाली येत असलेल्या संस्थांनी खालील प्रमाणे संस्थांस्तरांवर पूर्व नियोजन व पूर्वतयारी आणि इतर बाबीसेदर्भांत कार्यवाही करण्यांत यावी जेणे करुन वृक्षलागवडीचे उद्दीष्ट साध्य पूर्ण करता येईल.

1. सन 2018 मध्ये दिलेल्या उद्दिष्टयांप्रमाणे प्रत्येक संस्थेत,महाविद्याल्यात 50 वृक्ष लागवड करण्यांचे ठरविण्यांत आलेले आहे. प्रत्येक संस्थेने, संस्थेच्या परीसरात दिलेल्या उद्दिष्टयांप्रमाणे जास्तीत जास्त झाडे लावावी. त्यासाठी माती,खत व किटकनाशके घालून वृक्ष लागवडीपूर्वी किमान 3 महिने आधी दि. 31 मार्च 2018 पर्यंत खड्डे तयार करणे.
2. सर्व संस्था, महाविद्याल्य मध्ये सन 2018 मध्ये वृक्ष लागवड उद्दिष्टपूर्तीसाठी किती क्षेत्र उपलब्ध होईल ते लक्षात घेवुन त्यांचा समावेश लॅण्ड बॅक मध्ये करण्यांसाठी आपल्या संस्थेची माहिती दिलेल्या विवरण पत्र 1, 2,व 3 मध्ये भरून या कार्यालयास सादर करावे.
3. संस्था, महाविद्यालयाच्या परीसरात किंवा आजुबाजूला असणा-या मोकळया व पडीक जमिनीचा वापर मोठया प्रमाणात वृक्ष् लागवड करण्यांसाठी करण्यांत यावे.
4. संस्था, महाविद्यालयाच्या स्तरावर वृक्ष लागवडीनंतर रोपांचे जनावरांपासून आणि अन्य बाबीपासून संरक्षण होण्यासांठी योग्य आणि आवश्यक संगोपनासाठी ट्री गार्ड, पाण्यांची उपलब्धता यांची व्यवस्था वृक्षांचे जिवंत राहण्यांचे प्रमाण किमान 80 ते 90 टक्के राखण्यांसाठी उपाय योजना करण्यांत यांवी.
5. महाविद्यालय,संस्थेतील अधिकारी/कर्मचारी/विद्यार्थी यांना शासनांच्या वनविभागांमार्फत निर्माण करण्यांत आलेल्या **mahaforest.nic.in वेबसाईड वर Green Army Registration** करून वृक्ष लागवड कार्यक्रमांत मोठया प्रमाणात सहभागी होण्यास प्रोत्साहित करण्यांत यावे.

6. महाविद्यालय,संस्थेतील प्रत्येक विद्यार्थ्यांने किमान 1 झाड दत्तक घेवून त्यांचे संगोपन करण्यांसाठीची योजना तयार करुंन आपल्या स्तरांवर विद्यार्थ्यांना परिक्षेमध्ये वाढीव मार्कच्या स्वरूपात म्हणुन उच्च व तंत्रशिक्षण विभागांकडून धोरण निश्चित करण्यांत येत असल्यांने विद्यार्थ्यांच्या निर्दशनास आणुन दयावे.

7. महाविद्यालय,संस्थेमध्ये आपत्ती व्यवस्थापनासाठी जसा विद्यार्थ्यांकडुन निधी संकलित केला जातो, त्याच धर्तीवर वृक्ष लागवड आणि संगोपनासाठी संस्था, महाविद्यालय यांनी प्रत्येक विद्यार्थ्यांकडुन प्रत्येकी किमान रू. 2 प्रमाणे दरवर्षी जमा करून विद्यार्थ्यांकडुन एकत्रित उपलब्ध होणारा निधी कायमस्वरूपी वृक्षांच्या संगोपनासाठी वापरण्यांत येईल. अशा योजना/निर्णय आपल्या स्तरावर घेण्यांत यावा.

वरील सर्व बाबी लक्षात घेवुन आवश्यक ती कार्यवाही करण्यांत यावी आणि प्रत्येक संस्थेने वृक्ष लागवड कार्यक्रमांत प्रत्यक्ष सहभाग घेवून सहकार्य करावे. तसेच दिलेल्या विवरण पत्रात आपल्या संस्थेची माहिती भरून त्वरीत या कार्यालयास पाठवावे. जेणे करून उपवनसंरक्षक, नागपूर वनविभाग, नागपूर,यांना कालमर्यादेत पाठविणे शक्य होईल.

सहपत्रः- वरीलप्रमाणे

(गुलाबराव ठाकरे)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
नागपूर.

प्रत :- मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई (का.क्र. 16) यांना माहितीस सविनय सादर.